


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक ३०३, गुरुवार २२ ऑगस्ट २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

## खा. नीलेश लंके यांच्याकडून विधानसभेची तयारी सुरु

### शुक्रवारी स्वाभिमानी कार्यकर्ता मेळावा व बुथ कमिटी बैठक

पारनेर : प्रतिनिधी

**लवकरच होऊ घातलेल्या विधानसभा निवडणूकीची तयारी खासदार नीलेश लंके यांनी सुरू केली असून शुक्रवारी सकाळी ११ वाजता पारनेर-नगर मतदारसंघातील कार्यकर्त्यांचा मेळावा तसेच बुथ कमिटी सदस्यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.**

नगर-पुणे महामार्गावरील सुपा हद्दीतील ग्रीन हेवन मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यात आगामी निवडणूकीसंदर्भात कार्यकर्त्यांची मते जाणून घेतली जाणार आहेत. प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी मतदान घडवून आणण्यासाठी महत्वपूर्ण कामगिरी बजावणाऱ्या बुथ कमिटी सदस्यांची बैठकही बोलविण्यात आली असून या बैठकीत खा. लंके हे या सदस्यांची मते जाणून घेणार आहेत. अलिकडेच पार पडलेल्या लोकसभा निवडणूकीत बुथ कमिटीच्या सदस्यांनी अतिशय चांगले काम करीत खा. लंके यांना बहुतांश गावांमध्ये आघाडी मिळवून दिली होती. आता विधानसभेसाठीही याच बुथ कमिटी सदस्यांवर जबाबदारी सोपविण्यात येणार आहे. बुथ कमिटीमध्ये काही बदल करायचे असल्यास त्यावरही चर्चा करण्यात येणार आहे.

लोकसभा निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतल्यानंतर खा. लंके यांनी आमदारकीचा राजीनामा दिला होता. विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीस काही महिन्यांचा अवधी राहिल्याने लंके यांनी राजीनामा दिल्याने या जागेवर पोटनिवडणूक झालेली नाही. आता सन २०२४ च्या सार्वत्रीक निवडणूकीचे पडघम



वाजण्यास सुरूवात झाली असून कधीही निवडणूकीची घोषणा होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभुमीवर निवडणूकीच्या तयारीला खा. लंके हे लागले असून ते कार्यकर्त्यांची मते जाणून घेणार आहेत. या मेळाव्यास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नीलेश लंके प्रतिष्ठाणचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बाबाजी तरटे, नीलेश लंके प्रतिष्ठाणचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब खिलारी यांनी केले आहे.

#### विधानसभेला उमेदवार कोण ?

नीलेश लंके यांनी आमदारकीचा राजीनामा देत लोकसभेची निवडणूक लढवून विजय संपादन केल्यानंतर विधानसभेसाठी उमेदवार कोण ? ही चर्चा सुरू झाली. खा. लंके यांच्या पत्नी राणीताई लंके या विधानसभेच्या उमेदवार असतील अशा चर्चा सोशल मीडियावर लोकसभा निवडणूकीपासूनच सुरू झाल्या आहेत. मात्र खा. लंके यांनी अद्यापही विधानसभा उमेदवाराबाबत काहीही भाष्य केलेले नाही. पक्षाचे श्रेष्ठी उमेदवारीबाबत निर्णय घेतली. ते जो उमेदवार देतील त्यास निवडूण आणण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे वारंवार सांगतात. त्यामुळे शुक्रवारी होणाऱ्या या मेळाव्यात कोणाच्या नावावर चर्चा होणार याची उत्सुकता आहे.

#### शिवसेनेचा दावा

लोकसभा निवडणूकीत नीलेश लंके यांना शिवसेनेने मदत केली असल्याने पारनेर-नगर मतदारसंघ शिवसेनेला हवा अशी मागणी पक्षाच्या प्रवक्त्या सुषमा अंधारे यांनी मंगळवारी पारनेरमध्ये केली. अंधारे यांच्या मागणीनंतर राष्ट्रवादी कार्यकर्ते मात्र ही जागा आमची असून या जागेवरील हक्क आम्ही सोडणार नाही अशी त्यांनी भूमिका घेतली आहे. शिवसेनेच्या दाव्यानंतर या मेळाव्यात त्याचे काय पडसाद उमटतात याचीही उत्सुकता आहे.

## मंगलदास बांदल यांना ईडीकडून अटक

### घरात सापडलं कोट्यावधींच घबाड

पुणे : प्रतिनिधी

**पुणे जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती आणि जिल्ह्यातील एक वादग्रस्त राजकीय व्यक्तिमत्व असलेल्या पैलवान मंगलदास बांदल यांना सक्त वसुली संचालनालयाने (ईडी) अटक केली आहे. मंगळवारी पहाटे ईडीने बांदल यांच्या शिक्रापूर आणि पुण्यातील महंमदवाडी या निवासस्थानांवर छापे टाकले होते. पुण्यातील महंमदवाडी येथील निवासस्थानी बांदल यांची सुमारे १६ ते १७ तास चौकशी केल्यानंतर ईडीने रात्री उशिरा त्यांना ताब्यात घेऊन मुंबई कार्यालयामध्ये घेऊन गेले आहेत.**



काही कोटीतील रोख रक्कम, आलिशान गाड्या आणि लाखो रुपयांची मनगटी घडाळे इडीने जप्त केली असल्याचे समजते. बांदल यांच्या अटकेमागे नक्की काय राजकीय कनेक्शन आहे, याची पुणे जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारीवर बांदल यांनी शिरूर लोकसभा मतदारसंघात उभे राहण्याची तयारी केली होती. त्यांनी वंचितची उमेदवारी मिळवलेली होती, परंतु नंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या इंदापूर येथील भाजपच्या मेळाव्याला हजर राहिल्याने वंचितने त्यांची उमेदवारी रद्द केली. त्यानंतर बांदल यांनी महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांचा बारामतीत तर शिवाजीराव आढळराव यांचा शिरूरमध्ये प्रचार केला.

आगामी निवडणुकीत शिरूर-हवेली विधानसभा मतदारसंघांमध्ये बांदल स्वतः किंवा त्यांच्या पत्नी उभे राहण्याच्या तयारीत होते. यापूर्वी शिवाजी भोसले सहकारी बँकेच्या घोटाळा प्रकरणी बांदल प्रदीर्घकाळ येरवडा तुरुंगात होते. सध्या ते जामीनावर बाहेर आहेत. यापूर्वीही ईडीने त्यांना नोटीस पाठवून चौकशीसाठी बोलावले होते. चौकशीसाठी चार वेळा ते हजरही झाले होते. त्यानंतर ईडीने ही कारवाई केलेली आहे. ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर कारवाई झाल्याने पुणे जिल्ह्यात अनेक राजकीय अर्थ काढले जात आहेत. बांदल यांच्या पाठीमागे नक्की कोण लागले आहे आणि कशामुळे ही कारवाई झालेली आहे, यावर चर्चा सुरू आहे.

**ईडीच्या कारवाईने आश्चर्य**

मंगलदास बांदल नक्की कोणत्या पक्षात आहेत, याबद्दल नेहमीच गूढ असे; ते कधी कोणत्या पक्षात जातील याची कोणीही खात्री देत नसे, परंतु सध्या ते महायुतीमध्ये आहेत असाच राजकीय क्षेत्रामध्ये समज होता. बांदल यांच्यावर ईडी कारवाई झाल्याने मात्र आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

## कर्जुलेहर्या येथे प्रभावती घोगरे यांची तोफ धडाडणार!

### गुरूवारी खा. नीलेश लंके यांच्या सत्काराचे आयोजन

कर्जुले हर्या : प्रतिनिधी



**लोकसभा निवडणूकीत ऐतिहासिक विजय संपादन केल्याबददल कर्जुले हर्या ग्रामस्थांच्या वतीने खासदार नीलेश लंके यांच्या नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास कृषीभुषण प्रभावती घोगरे यांना प्रमुख पाहुण्या म्हणून आमंत्रीत करण्यात आले असून खा. लंके यांच्या विजयानंतर तालुक्यात प्रथमच येणाऱ्या श्रीमती घोगरे विरोधकांचा कसा समाचार घेणार याची उत्सुकता आहे.**

या कार्यक्रमाविषयी माहिती देताना बापूसाहेब शिर्के यांनी सांगितलों की, खा. लंके यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते यावेळी विविध विकास कामांचे भुमिपूजन तसेच लोकार्पण करण्यात येणार असून शंभर गरजू विद्यार्थ्यांना सायकलीचे वितरण, शेतकरी बांधवांना छत्री तसेच वृध्दांना काठीचे वितरण करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमात आजी माजी सरपंच, चेअरमन, व्हा. चेअरमन, आजी माजी सैनिक तसेच हिरकणी महिला ग्रामसंघ तसेच विविध संघटना पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान नवसंजीवनी महिला संयुक्त संस्था तसेच नीलेश लंके कल्याणकारी संस्थेच्या अध्यक्ष सविताताई ढवळे या भुषविणार असून ठाणे येथील कामगार नेते सुनील शेटे, उद्योजक तुषारशेठ यांनाही प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रीत करण्यात आले आहे. बाजार समितीचे सभापती, उपसभापती, संचालक, नीलेश लंके प्रतिष्ठाण व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी व सदस्य, पारनेर नगरपंचायतीचे नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक, माजी जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य, कोरठण खंडोबा देवस्थानचे पदाधिकारी व विश्वस्त, टाकळीढोकेश्वर गटातील सरपंच, उपसरपंच, चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक आदींनाही या कार्यक्रमासाठी आमंत्रीत करण्यात आले आहे.

## सौ.उषादेवी खिलारी यांचे निधन

### शोकाकूल वातावरणात टाकळीला अंत्यसंस्कार

टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी



**येथील सौ.उषादेवी सीताराम खिलारी यांचे बुधवारी पहाटे अडीच वाजता निधन झाले, मृत्यू समयी त्यांचे वय ८० वर्ष होते, त्यांचे मागे, पती तीन मुली दोन मुले, पुतणे, नातवंडे,असा परिवार आहे.**


अहमदनगर जिल्हा मराठा संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त सीताराम खिलारी यांच्या त्या पत्नी, साई सावली हॉस्पिटलचे संचालक डॉ. भाऊसाहेब खिलारी व माजी सरपंच शिवाजी खिलारी यांच्या त्या मातोश्री, तर पारनेर तालुका खरेदी विक्री संघ अध्यक्ष ॲड. रघुनाथ खिलारी यांच्या त्या चुलती होत.

शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर बुधवारी सकाळी साडे दहा वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांचे निधनामुळे टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांनी स्वयंस्फूर्त बंद पाळला. जिल्हा मराठा संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, सचिव विश्वासराव आठरे, सहसचिव जयंत वाघ, माजी सभापती जयश्री औटी, गंगाराम बेलकर, यांनी श्रद्धांजली अर्पण केली. या वेळी काशिनाथ दाते, गंगाधर रोहोकले, विकास रोहोकले, दूध संघ अध्यक्ष दत्तानाना पवार,प्रकाश गाजरे,प्राचार्य लक्ष्मण मतकर, रंगनाथ आहेर, जिल्हा मराठा शिक्षण संस्था, मुख्याध्यापक, शिक्षक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, क्षेत्रातील अनेक मान्यवर तसेच पारनेर तालुका मेडिकल असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

## राज्याचा कारभार कोण पहातं हेच कळत नाही!

### खा.सुप्रिया सुळेंनी घेतला फडणवीसांचा समाचार



पुणे : प्रतिनिधी

**बदलापूर येथे झालेल्या संतापजनक घटनेच्या विरोधात संपूर्ण राज्यभारत चीड व्यक्त केली जात आहे. यावरून राष्ट्रवादी काँग्रेसच्या ( शरदचंद्र पवार ) खासदारसुप्रिया सुळेयांनी राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली आहे. राज्याचे गृहमंत्री दिल्लीत असतात कारभार कोण पाहतं हेच कळत नाही, असे म्हणत सुप्रिया सुळेंनी फडणवीसांचा समाचार घेतला.**

पुणे महापालिकेच्या राजीव गांधी ई लर्निंग स्कुलच्या वर्धापन दिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमात सुप्रिया सुळे बोलत होत्या. राज्याला गृहराज्यमंत्री नाही आणि आपले गृहमंत्री कायम दिल्लीला असतात. त्यामुळे कारभार कोण पाहाते माहित नाही, पण हे जास्त दिवस आपल्याला सहन करायचे नाही २-३ महिन्यात हे बदलेल असे, सुप्रिया सुळे म्हणाल्या.

परवा बदलापूरमध्ये जी घटना घडली त्याचा आपण जाहीर निषेध केला पाहिजे. या घटनेबाबत सर्वांनी संवेदनशीलपणाने बोलायला हवे. तंत्रज्ञानबरोबार मुलीच नाही तर मुलांना देखील गुड टच बॅड टचचा प्रोग्राम घ्यायला हवा. हा सामाजिक प्रश्न आहे, मी म्हणत नाही यात प्रत्येकवेळी सरकार दोषी असेल पण सत्तेत असलेल्या लोकांनी नैतिकता दाखवायला हवी ते आम्हाला नेहमी नैतिकता शिकवतात, असे देखील सुळे म्हणाल्या.

**आपलं सरकार आल्यावर मंच्यावर बसलेल्या पैकी मंत्री होतील**

हा कार्यक्रम माजी उपमहापौर आणि काँग्रेस नेते आबा बागुल यांनी आयोजित केला होता. या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, काँग्रेसचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे, माजी मंत्री रमेश बागवे आणि स्वतः आबा बागुल उपस्थित होते. सुप्रिया सुळे यांचे भाषण सुरू असताना हे सर्व मान्यवर मंचावर बसलेले होते. या सगळ्यांकडे पाहत सुप्रिया सुळे म्हणाल्या, मी तुम्हाला शब्द देते महाविकास आघाडी सरकार आल्यावर मंचावर बसलेल्यापैकी काही मंत्री होतील. तेव्हा माझ्या मतदारसंघातील काम तुम्ही कराल अशी अपेक्षा आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मंचवरील इच्छुकांच्या मनामध्ये आनंदाची उकळी फुटली होती.

**आबा बागुल यांची प्रोग्राम डिप्लोमसी**

आबा बागुल हे सहा टर्म पुणे महापालिकेचे नगरसेवक राहिलेले आहेत. आता त्यांना विधानसभा निवडणूक लढवण्याचे वेध लागले आहेत. मात्र महाविकास आघाडीमध्ये ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसकडे असल्याने या जागेवरून आघाडीत बिघाडी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आबा बागुल यांनी उमेदवारी मिळवण्यासाठी काँग्रेससह आता राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये देखील लॉबिंग करायला सुरुवात केली आहे. त्यामुळे आबा बागुल यांनी आपल्या या कार्यक्रमाला थेट सुप्रिया सुळे यांना निमंत्रण दिल. आता आबा बागुल यांचं तिकीट मिळवण्यासाठी सुरू असलेली ही प्रोग्राम डिप्लोमसी शहरात चर्चेचा विषय ठरत आहे.




## ७० टक्के लाडक्या बहिणी मोफत ३ सिलिंडरपासून राहणार वंचित ?

### सरकार काय तोडगा काढणार याकडे लक्ष

यवतमाळ :प्रतिनिधी

**राज्य शासनाच्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेनंतरची दुसरी महत्त्वकांक्षी योजना म्हणजे मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना. यात लाडक्या बहिणीला वर्षाला तीन मोफत सिलिंडर रिफिल मिळणार. याचा ३० जुलैला शासन अद्यादेश निघाला. मात्र, प्रधानमंत्री उज्वला योजना वगळली तर बहुतांश गॅस कनेक्शन हे घरातील पुरुषांच्या नावे आहे. त्यामुळे जिल्ह्यातील ७० टक्केवर महिला यापासून वंचित** उर्वरीत पान ३ वर





# छंदेरी



## लारा दत्ताने सुनावले!

मिस युनिव्हर्स आणि अभिनेत्री लारा दत्ता सध्या तिच्या आगामी 'स्ट्रॅटेजी : बालाकोट अँड बियॉन्ड' या वेब सीरिजमुळे चर्चेत आहे. लाराने तिच्या करिअरमध्ये अनेक सुपरहिट सिनेमे केले आहेत. मागच्या काही काळपासून अभिनयक्षेत्रापासून दूर असणारी लारा आता कमबॅक करत आहेत. या सीरिजच्या निमित्ताने दिलेल्या मुलाखतीत तिने घाणेरड्या कमेंट्स व ट्रोलिंगबद्दल तिचं मत मांडलं आहे.

नुकत्याच 'पिंकविला'ला दिलेल्या मुलाखतीत लाराने नकारात्मक कमेंट्स व ट्रोलिंगबद्दल तिला काय वाटतं ते सांगितलं. वैयक्तिकरित्या मी सोशल मीडियावर फारशी सक्रिय नाही. मी सोशल मीडियावर तितकीच सक्रिय आहे जितकी मला व्हायचं आहे. जर मला सतत फॉलोअर्स, लाईक्स आणि कमेंट्सची पाहिजे असतील, तर मला त्यासोबत येणाऱ्या प्रत्येक गोष्टीसाठी तयार राहावं लागेल, असं लारा म्हणाली. लाराने फॉलोअर्स कमी असण्याबाबत म्हणाली, की माझ्या सोशल मीडिया फीडमध्ये माझ्यासाठी खास गोष्टी आहेत, या खास गोष्टी जे माझे खरे फॉलोअर्स आहेत त्यांच्यासह मला त्या शेअर करायच्या आहेत. म्हणूनच माझे फारसे फॉलोअर्स नाहीत, पण जे लोक सोशल मीडियावर खरे आहेत, ते कधीच तुम्हाला वाईट बोलणार नाहीत.

## अभिनेत्री श्रुती हासन अन् शांतनू हजारिकाचं ब्रेकअप

**दिग्गज अभिनेते कमल हासन यांची लेक श्रुती हासनचं ब्रेकअप झालं आहे. तिचं बॉयफ्रेंड शातनू हजारिकासोबतचं चार वर्षांचं नातं संपलं आहे. दाक्षिणात्य चित्रपटांपासून ते बॉलीवूडपर्यंत आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणारी श्रुती सध्या तिच्या ब्रेकअपमुळे चर्चेत आली आहे. तिने व शांतनूने आता आपापल्या आयुष्यात वेगळ्या वाटा निवडल्या आहेत.**

'हिंदुस्तान टाईम्स'च्या वृत्तानुसार, चार वर्षांपासून रिलेशनशिपमध्ये असलेल्या श्रुती हासन आणि तिचा बॉयफ्रेंड शांतनू हजारिका वेगळे झाले आहेत. त्यांनी सोशल मीडियावर एकमेकांना अनफॉलो केलं आहे. श्रुतीने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर शांतनूबरोबरचे फोटो शेअर केले होते, तेही हटवले आहेत. श्रुती आणि शंतनू यांच्यात काही वैयक्तिक समस्या होत्या. त्यामुळे त्यांनी ब्रेकअप करण्याचा निर्णय घेतला, असं म्हटलं जातंय. पण अद्याप दोघांनीही यावर कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. श्रुती आणि शांतनू काही वर्षांपासून डेटिंग करत होते आणि लिव्ह-इन रिलेशनशिपमध्येही राहत होते. ते अनेकदा एकत्र कार्यक्रमांना हजेरी लावायचे. ते सार्वजनिकपणे एकमेकांवरील प्रेम जाहीर करायचे. शांतनू हा एक प्रसिद्ध डूडल आणि मल्टीडिस्पलनरी व्हिज्युअल आर्टिस्ट आहे. त्याने रफ्तार, डिवाईनसह अनेक लोकप्रिय सेलिब्रिटींबरोबर काम केलंय. श्रुतीने अजून ब्रेकअपबद्दल प्रतिक्रिया दिली नसली, तरी तिच्या इन्स्टाग्राम हँडलवर एक स्टोरी शेअर केली होती. हा एक खूप चांगला प्रवास होता, मला स्वतःबद्दल आणि लोकांबद्दल खूप काही शिकायला मिळालं, असं त्या पोस्टमध्ये लिहिलं होतं.



## कृष्णा मुखर्जीने सांगितला सेटवरील धक्कादायक प्रसंग



मालिका म्हटलं तर १२ ते १५ तास कलाकार मंडळी काम करत असतात. यादरम्यान त्यांना अनेक वाईट अनुभव येतात. असाच काहीसा धक्कादायक अनुभव एका प्रसिद्ध अभिनेत्रीनं सोशल मीडियाद्वारे शेअर केला आहे. 'ये है मोहब्बतें', 'नागिन ३', 'कुछ तो है : नागिन के एक रंग में' या मालिकांमध्ये झळकलेली अभिनेत्री कृष्णा मुखर्जीनं 'शुभ शगुन' मालिकेच्या सेटवरील धक्कादायक प्रसंग शेअर केला आहे. मालिकेच्या सेटवर निर्मात्याकडून झालेल्या छळाविषयी ती सोशल मीडियावर व्यक्त झाली आहे. कृष्णाने पोस्टमध्ये लिहिलं, मला कधीही मनातील गोष्ट सांगायची हिंमत नव्हती. पण आज मी निर्णय घेतला की ही गोष्ट अजून मनात नाही ठेवू शकतं. मी सध्या कठीण काळातून जात असून मागील दीड वर्ष माझ्यासाठी अजिबात सोपे नव्हते. मी खूप अस्वस्थ आहे. जेव्हा मी एकटी असते तेव्हा खूप रडत असते. हे सर्व सुरू झालं, जेव्हा मी 'दंगल' वाहिनीवरील शेवटची मालिका 'शुभ शगुन' करायला सुरुवात केली. माझ्या आयुष्यातला हा सर्वात वाईट निर्णय होता. पुढे अभिनेत्रीनं लिहिलं, की मी दुसऱ्यांचं ऐकून ही मालिका करण्याचा निर्णय घेतला होता. मी स्वतः ही मालिका करू इच्छित नव्हती. या मालिकेच्या प्रोडक्शन हाउस आणि निर्माता कुंदन सिंहनं मला खूप त्रास दिला. एवढंच नाही तर ऐकवेळ त्यानं मला मेकअप रुममध्ये बंद केलं होतं. तेव्हा मी आजारी होते. या मालिकेचा निर्माता मला मानधन देखील वेळच्या वेळी देत नव्हता. त्यामुळे मी शूटिंगला न जाण्याचा निर्णय घेतला. जेव्हा मी आजारी असताना मेकअप रुम कपडे बदलत असायची तेव्हा बाहेरून जोरजोरात दरवाजा वाजवायचे, जसं काही दरवाजा आता तोडणारचं आहेत. मला पाच महिन्यांचं मानधन मिळालं नाहीये. यासाठी मी प्रोडक्शन हाउस आणि 'दंगल' वाहिनीकडेही गेले. परंतु मला कोणाकडूनही उत्तर मिळालं नाही. याऐवजी मला धमकी दिली जात होती. मला असुरक्षित वाटतं आहे. याप्रकरणी मी अनेकांकडून मदत मागितली. मात्र कोणीही मदत केली नाही, असं स्पष्ट कृष्णा सांगितले.

## ऑस्ट्रेलियाहून पूजा सावंत परतली..?




'महाराष्ट्राची कलरफुल' अभिनेत्री म्हणून पूजा सावंतला ओळखलं जातं. अभिनेत्रीचा विवाहसोहळा फेब्रुवारी महिन्यात थाटामाटात पार पडला होता. पूजाच्या लग्नाला कलाविश्वातील बरीच मंडळी उपस्थित होती. थाटामाटात लग्न झाल्यावर अभिनेत्री काही दिवसांनी ऑस्ट्रेलियाला गेली. पूजाचा नवरा सिद्धेश चव्हाण हा कामानिमित्त ऑस्ट्रेलियात असतो. त्यामुळे ती सुद्धा लग्नानंतर काही दिवसांसाठी ऑस्ट्रेलियाला गेली. परदेशात अभिनेत्रीने लाडक्या नवऱ्याबरोबर एकत्र होळी व गुढीपाडव्याचा सण साजरा केला होता. यातील एका व्हिडीओमध्ये पूजाच्या ऑस्ट्रेलियातील घराची संपूर्ण झलक तिच्या चाहत्यांना पाहायला मिळाली होती.

लग्नाआधी पूजाला लग्नानंतर ऑस्ट्रेलियात स्थायिक होणार की नाही? असं विचारण्यात आलं होतं. यावर काही वर्षांसाठी सिद्धेश ऑस्ट्रेलियात आहे. म्हणून मी काही वर्ष येऊन जाऊन करेन. हे अरेंज मॅरेज असल्यामुळे आम्ही सगळ्या गोष्टींसाठी तयार आहोत, असं पूजाने सांगितलं होतं. ऑस्ट्रेलियात दीड महिन्याहून अधिक काळ घालवल्यानंतर आता इन्स्टाग्राम स्टोरी शेअर करत पूजाने मुंबईत परतल्याचे संकेत दिले आहेत. या स्टोरीमध्ये विमान लँड करत असल्याचं दृश्य पाहायला मिळत आहे. याशिवाय विमानाच्या खिडकीतून हा व्हिडीओ काढल्यामुळे संपूर्ण शहराची झलक यामध्ये दिसत आहे. पूजाने या व्हिडीओला लागली ओढ मन हे लई द्वाड...आताच बया का बावरलं हे गाणं जोडलं आहे. तसेच याच्या कॅप्शनमध्ये तिने "There She is" असं लिहिलं आहे. दरम्यान, व्हिडीओला लावलेलं मराठी गाणं, विमानतळाच्या स्टोरीज यावरून पूजा पुन्हा मुंबईत परतली का? अशा चर्चा रंगल्या आहेत. एकंदर व्हिडीओ पाहता आणि गाणं बघता ती मुंबईला येत असावी असं वाटतंय पण, पूजाने याबाबत काहीच माहिती दिलेली नाही.

## सात वर्षांनी लहान अभिनेत्याला डेट करतेय कोंकणा सेन शर्मा


### लग्नासाठी ठिकाण शोधत असल्याच्या चर्चांना उधाण





बॉलीवूडमधील सर्वोत्तम अभिनेत्रींपैकी एक म्हणजे कोंकणा सेन शर्मा होय. तिने आपल्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर छाप सोडली आहे. नुकत्याच आलेल्या 'किलर सूप' या सीरिजमधील अभिनयासाठी तिचं खूप कौतुक झालं. उत्तम दिग्दर्शिका व अभिनेत्री असलेली कोंकणा सध्या तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आली आहे. कोंकणाने २०१० मध्ये अभिनेता रणवीर शौरी याच्याशी लग्न केलं होतं. पण १० वर्षांच्या संसारानंतर ते २०२० मध्ये विभक्त झाले. या जोडप्याला एक मुलगा देखील आहे. आता पुन्हा एकदा कोंकणाच्या आयुष्यात प्रेम आल्याचं म्हटलं जातंय. कोकणा तिच्यापेक्षा वयाने लहान असलेल्या अमोल पराशरला डेट करत असल्याचं म्हटलं जात आहे. ४४ वर्षी कोंकणा व ३७ वर्षीय अभिनेता अमोल पराशर एकमेकांसह डेटिंग करत असल्याच्या चर्चा होत्या. यावर कोंकणाचा पूर्वाश्रमीचा पती रणवीर शौरीने प्रतिक्रिया दिली आहे. त्याची प्रतिक्रिया व्हायरल झाल्यानंतरच कोंकणा व अमोल खरंच रिलेशनशिपमध्ये असल्याचं म्हटलं जातंय. एका एक्स अकाउंटवरून अमोलच्या इन्स्टाग्राम स्टोरीचा स्क्रीनशॉट शेअर केला आहे. यात अमोल एका राजकीय इव्हेंटबद्दल बोलतोय. त्याचा स्क्रीनशॉट शेअर करताना लिहिलंय, कोंकणा सेन शर्माने मोदी भक्त रणवीर शौरी सोडून धर्मनिरपेक्ष अमोल पराशरला डेट करण्याचा सर्वात चांगला निर्णय घेतला. या पोस्टवर रणवीर शौरीने कमेंट केली आहे. होय, मी पण सहमत आहे, असं रणवीरने म्हटलंय. त्याने ही कमेंट करून कोंकणा व अमोलच्या नात्यावर शिक्कामोर्तब केल्याची चर्चा होत आहे.

## मधुगंधाने सांगितला मालिका अन् चित्रपटातील कामाचा फरक..!



चित्रपट व मालिकांमध्ये काम करणाऱ्या कलाकारांप्रमाणेच संबंधित कलाकृती लिहिणारी लेखिका किंवा लेखक सुद्धा तेवढाच महत्त्वाचा असतो. पडद्यामागून ते मोठी भूमिका बजावत असतात. मधुगंधा कुलकर्णी ही उत्तम अभिनेत्री असण्याबरोबरच एक उत्तम लेखिका म्हणून देखील ओळखली जाते. सध्या ती 'नाच गं घुमा'च्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. यानिमित्ताने अभिनेत्रीने एका मुलाखतीत मालिका व चित्रपट लेखनामधील फरक स्पष्ट केला आहे. मधुगंधा कुलकर्णीने आजवर अनेक मालिकांचं लेखन केलं आहे. याशिवाय 'वाळवी', 'एलिझाबेथ एकादशी', 'चि. व चि. सौ का' अशा अनेक चित्रपटांचं लेखन देखील तिने केलं आहे. आता लवकरच मधुगंधाचा 'नाच गं घुमा' हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

मधुगंधाला या वेळी 'तारांगण'च्या मुलाखतीत चित्रपट व मालिकांच्या लेखनाबाबत प्रश्न विचारण्यात आला. अभिनेत्री म्हणाली, चित्रपट लेखनात अर्थात जास्त आनंद मिळतो कारण, आपल्याला जे म्हणायचं ते स्पष्टपणे सांगता येतं. पण, टीव्हीवरच्या लेखनात काय अपेक्षित आहे हे आपल्या हातात नसतं. एका विशिष्ट पद्धतीत मालिकांचं लेखन करावं लागतं. त्या कंटेन्टशी तुम्ही दरवेळी लेखक आणि माणूस म्हणून सहमत असता असं नाहीये. याउलट चित्रपटांमध्ये आपल्याला जे सांगायचंय ते लगेच मांडता येतं. पण, चित्रपट हा बेभरवशाचा धंदा आहे. मालिकांमध्ये दर महिन्याला तुम्हाला एका मोठा चेक येतो घरी...याचा आनंद आहे, असं मधुगंधा कुलकर्णीने सांगितलं. दरम्यान, मधुगंधा कुलकर्णी आणि परेश मोकाशी यांचा 'नाच गं घुमा' हा चित्रपट येत्या १ मे रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.

## तू दत्तक मुलगी का? श्रिया म्हणाली...



अभिनेत्री श्रिया पिळगावकर सध्या 'ब्रोकन न्यूज २' या तिच्या वेब सीरिजमुळे चर्चेत आहे. राधा भार्गवच्या रुपात पुन्हा एकदा ती प्रेक्षकांची मनं जिंकण्यासाठी तयार आहे. दिग्गज मराठमोळं सेलिब्रिटी जोडपं सुप्रिया व सचिन पिळगांवकर यांची लेक श्रिया ही दत्तक मुलगी असल्याच्या काही बातम्या येत होत्या. आता एका मुलाखतीत खुद्द श्रियालाच याबाबत विचारण्यात आलं आहे. अभिनेत्रीने तिच्या दत्तक असल्याच्या चर्चांवर प्रतिक्रिया दिली आहे.

'इंडिया टुडे'ला दिलेल्या मुलाखतीत, श्रियाला ती दत्तक मुलगी असल्याच्या बातमीबद्दल विचारण्यात आलं. त्यावर ती म्हणाली, एका बातमीत कुठेतरी म्हटलं होतं की मला दत्तक घेण्यात आलं होतं. पण तसं नाही, मी माझ्या आई-वडिलांची दत्तक मुलगी नाही. त्यांनी मला दत्तक घेतल्याची एक बातमी आली होती, पण ती पूर्णपणे खोटी बातमी आहे. श्रिया म्हणाली, dh खरं तर मी काहीतरी स्पष्टीकरण त्यावं असा हा विषय नाही, कारण मी माझी बाजू मांडण्यासाठी माझं जन्म प्रमाणपत्र इन्स्टाग्रामवर दाखवणार नाहीये. पण हो, ही बातमी अजिबात खरी नसली तरी हास्यास्पद नक्कीच होती. पण, याशिवाय माझ्याबद्दल इतर कोणत्याही वाईट गोष्टी लिहिल्या गेलेल्या नाहीत. तिच्या वेब सीरिजच्या विषयाला अनुसरून बातम्यांमध्ये राहण्याबद्दल तिला विचारण्यात आलं. श्रिया म्हणाली, खरं तर मी या क्षणापुरतं बातम्यांमध्ये राहण्याचा विचार करत नाही, तर येणाऱ्या वर्षांसाठी प्रासंगिक राहण्याचा विचार करते. त्यामुळे मी छोट्या-मोठ्या पीआर ॲक्टिव्हिटीजच्या दृष्टिकोनातून त्याकडे पाहत नाही. माझ्यासाठी एक अभिनेता म्हणून तुम्ही किती शिकत आहात आणि विकसित होत आहात हे महत्त्वाचं आहे. माझे वडील ६० वर्षांपासून या क्षेत्रात काम करत आहेत आणि अजूनही ते या इंडस्ट्रीशी संबंधित आहेत. त्याचं कारण म्हणजे त्यांना सतत काहीतरी शिकायचंय आणि स्वतःच विकास करायचा आहे. मी 'फॅन' चित्रपट केला तेव्हा शाहरुख खानच्या बाबतीतही असंच होतं. भूक आणि अजून चांगलं काम करण्याची इच्छा आपोआप प्रासंगिकता आणते. मी वैयक्तिकरित्या कधीही बातम्यांमध्ये राहण्याचा प्रयत्न केला नाही किंवा प्रसिद्धी स्टंट म्हणून माझ्याबद्दल खोट्या बातम्या दिल्या नाहीत.

## आमिर तिसरं लग्न कधी करणार?



बॉलिवूडचा मिस्टर परफेक्शनिस्ट असं म्हटलं की आपल्यासमोर आपसूकच नाव येतं ते आमिर खानचं. आमिर खान त्याच्या चित्रपटांमुळे त्याच्या वक्तव्यांमुळे कायमच चर्चेत असतो. मुलाखतींमध्ये आमिर खान उत्तरं अशी काही देतो की त्याचे चाहतेही विचारात पडतात. याच आमिर खानने कपिल शर्माच्या द ग्रेट इंडियन कपिल शोमध्ये उपस्थिती दर्शवली होती. नेटफ्लिक्स या ओटीटी प्लॅटफॉर्मवरचा हा शो आहे. या शोचा एक प्रोमो सध्या चर्चेत आहे. त्यावरून आमिर खान ज्या एपिसोडमध्ये येणार त्यात धमाल होणार हेच दिसतंय. एक प्रश्न आमिर खानला कपिल विचारतो तेव्हा त्याचा चेहरा मात्र पाहण्यासारखा झाला आहे. या शोच्या प्रोमोची चर्चा चांगलीच रंगली आहे. आमिर खान आणि किरण राव यांचा घटस्फोट झाल्यापासून आमिरच्या तिसऱ्या लग्नाची चर्चा सुरु झाली आहे. आमिर खान फातिमा सना शेखसह तिसरं लग्न करणार अशा अफवाही आल्या होत्या. याच अनुषंगाने काहीसा असाच प्रश्न आमिरला कपिल शर्मा विचारतो. कपिल विचारतो, की आमिरसर तुम्हालाही वाटतं का आता सेटल झालं पाहिजे? त्यावर आमिर काही सेकंदासाठी शांत होतो आणि त्यानंतर तो हसतानाच दाखवला आहे.

## शॉर्ट न्यूज

### लायन्स क्लबच्या पदाधिकाऱ्यांचे पदग्रहण

**नगर :** शहरात मागील ३१ वर्षापासून सामाजिक योगदान देणारे लायन्स क्लब ऑफ अहमदनगर मिडटाऊनचा पदग्रहण सोहळा सेवा कार्याचा संकल्प करुन पार पडला. लायन्स मिडटाऊनचे नवनिर्वाचित अध्यक्ष प्रसाद मांढरे, सचिव संदीपसिंग चव्हाण, खजिनदार डॉ. संदीप सांगळे तर सहसचिव नरेंद्र मुळे व माधवी मांढरे आदींसह पदाधिकाऱ्यांना पदाची सूत्रे प्रदान करण्यात आली. संदीप सांगळे, डॉ. कल्पना ठुबे, शोभा भलसिंग, संतोष मानकेश्वर, संपूर्णा सावंत आदींसह लायन्सचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### श्रीगोंदा तालुक्यात पुन्हा जोरदार पाऊस

**श्रीगोंदा :** पंधरा दिवसाच्या प्रदीर्घ विश्रांतीनंतर श्रीगोंदा तालुक्यात पुन्हा जोरदार पावसाची सुरुवात झाली आहे. दरम्यान दोन-तीन दिवसांपासून उन्हाची तीव्रता अधिक होत गेल्याने उष्णतेचे प्रमाण देखील वाढताना दिसत होते. त्यामध्ये खरीप पिकांनाही पाण्याची आवश्यकता होती ती आता पावसाने भरुन काढल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. दरम्यान चालू वर्षी पावसाने वेळेत हजेरी लावल्याने खरिपाची पिके सर्वत्र बहरलेली दिसतात. तर मागील पावसाने नद्या,ओढे,नाले, बंधारे इत्यादी तुडुंब भरलेली असतानाच आता पुन्हा पावसाने जोर धरला आहे.

### विद्यार्थ्यांकडून रक्षाबंधन साजरा

**नेवासा :** तालुक्यातील किड्स किंग्डम अकॅडमीमध्ये सामुदायिक रक्षाबंधन सण साजरा करण्यात आला. मुलींना स्वतःची सुरक्षा कशा पद्धतीने करायची यासाठी जाधव यांच्याकडून कराटेचे प्रशिक्षण देण्यात आले तसेच मुलींनी शाळेतील सर्व मुलांना राख्या बांधल्या. मुलांनी मुलींसाठी छोट्याशा भेटवस्तू दिल्या. प्राचार्या कीर्ती बंग यांनी मुलींना मार्गदर्शन केले. ज्ञानेश्वरी शिंदे या विद्यार्थिनीने मनोगत व्यक्त केले. काजल कसबे, सुरेखा वाकचौरे, अमिशा बंब यांनीही या मुलींना मार्गदर्शन केले.

### ट्रकच्या धडकेत सून ठार, सासरे जखमी

**सोनई :** येथून बाजार करून घराकडे मोटारसायकलवरुन परतत असताना ट्रकने दिलेल्या धडकेत मोटारसायकलवरील सून ठार झाली तर सासरे गंभीर जखमी झाल्याची घटना गणेशवाडी येथे घडली. घराच्या अगदी जवळ आल्यावर समोरून भरधाव येणाऱ्या सिमेंटच्या ट्रकने समोरुन मोटर सायकलला जोरदार धडक दिली. त्यामध्ये सून शिला बाळासाहेब पालवे ह्या जागेवरच मयत झाल्या तर सासरे हे गंभीररित्या जखमी झाले. त्यांना तातडीने नगर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ट्रक चा पाठलाग करून तरुणांचं पोलिसांनी चालकाला ताब्यात घेतले.

### सत्ताधारी सरकार घोषणाबाज सरकार : तनपूरे

**राहुरी :** सत्ताधारी सरकार फक्त घोषणाबाज सरकार आहे. राजकीय स्वार्थ पाहून नवीन योजनांची घोषणा करत आहेत. पण मागच्या घोषणांचे काय? माझ्या विरोधात कोणीही लढू द्या. आपण आपल्या ५ वर्षाच्या कामाशी प्रामाणिक आहोत. राज्यात पुन्हा महाविकास आघाडीचेच सरकार येणार, ही काळ्या दगडावरची रेश आहे. असा विश्वास आमदार प्राजक्त तनपुरे यांनी व्यक्त केला.

# सराला बेट येथे भाविकांनी घेतली महंताची भेट

## महंत रामगिरी महाराजांनी केले भाविकांना मार्गदर्शन



**श्रीरामपूर : प्रतिनिधी**

**हिंदू समाजाला जागृत करण्याच्या दृष्टीने समाजातील अनिष्ट प्रथांना मुठमाती द्यावी, असे आवाहन सरला बेटाचे महंत रामगिरी महाराज यांनी केले. श्रीरामपूरातून आलेल्या भाविकांना त्यांनी मार्गदर्शन केले.**

महंत रामगिरी महाराजांच्या समर्थनार्थ श्रीरामपूरवरून मोठ्या संख्येने श्रीरामपूर शहर व तालुक्यातील प्रकाश चित्ते, बाबा शिंदे, प्रशांत लोखंडे, देविदास चव्हाण, बबन मुठे, सुरेश दीपक चव्हाण, संजय यादव आदींस समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी महंत रामगिरी महाराज म्हणाले, आदर्श जर चांगले नसतील, तर समाज केव्हाही रसातळाला जाऊ शकतो. सर्व धर्मांबद्दल आदरच आहे. धर्मग्रंथातील वस्तुस्थिती मी समाजासमोर मांडली. हा घटनेने दिलेला अधिकार आहे. हिंदू समाज सहनशील आहे. हिंदुत्वादी संघटनांनी संयमाने, शांततेने कुठले गालबोट लागणार नाही, याची काळजी घ्यावी, असे आवाहनही महंत रामगिरी महाराज यांनी उपस्थित भाविकांना केले.

याप्रसंगी भाजप ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष प्रकाश चित्ते म्हणाले, भारताच्या सीमांवरील सुरक्षा धोक्यात आहे, तशी अंतर्गत सुरक्षाही धोक्यात आहे. त्यादृष्टीने देशाची अखंडतेचा अविभाज्य घटक असलेल्या हिंदू समाजाला जागृत करणे गरजेचे आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले.

# शिर्डीच्या साईबाबांना तब्बल ३५ किलोची राखी अर्पण

## राखीमध्ये लक्ष्मीबाईंना दिलेल्या नऊ नाण्यांची थीम



**शिर्डी : प्रतिनिधी**

**राज्यभरात श्रावणी सोमवार आणि रक्षाबंधनानिमित्ताने उत्साहाचे वातावरण होते. साईच्या शिर्डीतही मोठ्या भक्तीभावाने आणि आस्थेने राखी पौर्णिमा उत्सव साजरा करण्यात येतो. रक्षाबंधनानिमित्ताने छत्तीसगड राज्यातील बिलासपूर येथील एका साईभक्ताने तब्बल ३५ किलो वजनाची ३६ फूट लांब व ५ फूट रुंद राखी साईबाबांना अर्पण केली.**

रक्षाबंधन निमित्त छत्तीसगडमधील बिलासपूर येथील साईमाऊली परिवाराकडून प्रबोधराव यांनी ही राखी साईबाबांना समर्पित केली. ही राखी कलाकार दिलीप दिवाकर पात्रीकर यांनी १० दिवसांत बनवली. यामध्ये फायबर प्लाय, मोती, जरी, बुटी आदींचे काम करण्यात आले आहे. साईनाथांनी लक्ष्मीबाईंना दिलेली नऊ नाण्याची थीम या राखीमध्ये समाविष्ट केली आहे. प्रत्येक नाणे श्रीमद भागवत आणि श्री रामचरितमानस यांच्या नवविधा भक्तीचे एक वैशिष्ट्य दर्शवते तेच या राखीमध्ये समाविष्ट केले आहे.

या राखीचे साईबाबा संस्थानतर्फे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर व त्यांच्या पत्नी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी तुकाराम हुलवळे व त्यांच्या सुविद्य पत्नी तसेच राखी देणगीदार साईभक्त प्रबोधराव यांच्याहस्ते विधिवत पूजन करून अर्पण करण्यात आले. यावेळी मंदिर विभागप्रमुख विष्णू थोरात, जनसंपर्क अधिकारी तुषार शेळके, मंदिर पुजारी व कर्मचारी उपस्थित होते. आजवरच्या इतिहासात साई समाधी मंदिरात साईबाबांना रक्षाबंधनाच्या दिवशी हातात राखी बांधन्यात येते.

(पान १ वरून)

## ७० टक्के लाडक्या बहिणी मोफत ३ सिलिंडरपासून राहणार वंचित ?

**राहणार त्यामुळे यावर सरकार काय तोडगा काढणार? याकडे राज्यातील लाडक्या बहिणींचे लक्ष लागले आहे.**

जिल्ह्यात उज्वला वगळता सुमारे पाच लाख ६० हजार गॅस जोडण्या आहेत. यामध्ये पन्नास टक्के गॅस जोडण्या पुरुषांच्या नावे आहेत. जिल्ह्यातील महिलांना धूरमुक्त वातावरण मिळावे, गरीब कुटुंबांना स्वयंपाकासाठी स्वच्छ इंधन पुरविणे व महिलांचे आरोग्य सुधारावे यासाठी २०१६ मध्ये प्रधानमंत्री उज्वला योजना कार्यान्वित करण्यात आली. योजनेंतर्गत तेल कंपन्यांच्या सहकार्याने महिलांना गॅस जोडणी मिळाली आहे. परंतु, गॅस सिलिंडरच्या वाढत्या किमतीमुळे सिलिंडर खरेदी करणे परवडत नाही. त्यामुळे अनेक महिला चुलीकडे वळू लागल्या आहेत.

त्यामुळे राज्य शासनाने उज्वला योजनेंतर्गत पात्र लाभार्थी व मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेस पात्र ठरलेल्या महिलांसाठी अन्नपूर्णा योजना राबविण्याची घोषणा केली होती. त्यानंतर ३० जुलै रोजी परिपत्रकही काढले होते. प्रशासनाने ही योजना तळागाळातील लाभार्थीपर्यंत पोहोचविण्याची तयारी केली आहे. जिल्ह्यातील चार लाख ६० हजार महिलांच्या खात्यात लाडकी बहीण योजनेचा लाभाची रक्कम जमा झाल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. मात्र, या योजनेत पात्र महिलांऐवजी कुटुंबातील कर्त्या पुरुषांच्या नावे गॅस जोडणी असल्याचे समोर येत आहे.

जिल्ह्यात उज्वला वगळता सुमारे पाच लाखावर गॅस जोडण्या आहेत. यामध्ये पन्नास टक्के गॅस जोडण्या पुरुषांच्या नावे आहेत. त्यामुळे उज्वला योजनेव्यतिरिक्त पन्नास टक्केच महिलाच यात योजनेस पात्र ठरू शकतात. उर्वरित महिला लाभापासून वंचित राहणार आहेत. त्यामुळे सर्वच पात्र महिलांना मोफत गॅस योजनेचा लाभ द्यावा, अशी मागणी महिला वर्गातून केली जात आहे.

**ई-केवायसीचे काम ४५ टक्के पूर्ण**

जिल्ह्यात विविध ऑइल कंपन्यांमार्फत प्रधानमंत्री उज्वला योजनेंतर्गत एक लाखावर गॅस जोडण्या दिल्या आहेत. त्यापैकी ४५ टक्के लाभार्थींची ई-केवायसी पूर्ण झाली आहे. ५ ५ टक्के लाभार्थी अद्याप ई केवायसी केली नसल्याने ई-केवायसीसाठी आता उज्वलाचे लाभार्थी गॅस एजन्सीसमोर गर्दी करू लागले आहेत.

**स्वतःच्या नावे गॅस जोडणी असणे आवश्यक**

गॅस जोडणी महिलांच्या नावावर असणे बंधनकारक आहे. १४.२ किलोच्या गॅस सिलिंडरची जोडणी असलेल्या गॅस धारकांना लाभ मिळणार आहे. प्रधानमंत्री उज्वला योजनेंतर्गत पात्र लाभार्थी योजनेस पात्र असतील. लाडक्या बहीण योजनेतील पात्र लाभार्थींना अन्नपूर्णा योजनेच्या लाभासाठी गॅस जोडणी नावे असणे आवश्यक आहे.




### वाचकांच्या लेखणीतून

## उष्ट्रलकुटी न्याय

जगात देव आहे की नाही, यावर आत्तापर्यंत अनेकदा वादविवाद झाले आहेत. होत आहेत. होत राहतील.
एक कीर्तन यू ट्यूबवर ऐकत होतो. जगात देव आहे, असा सिध्दान्त बुवांना पटवून द्यायचा होता. ते श्रोत्यांना उद्देशून म्हणत होते : देव नाही म्हणणारे प्रत्यक्ष हाच पुरावा होय असा आपला पक्ष पुढे करतात. त्यांना उत्तर म्हणून बुवा म्हणतात, तुम्ही म्हणता ना प्रत्यक्ष हाच पुरावा. मग मृगजळात पाणी दिसते. पण प्रत्यक्षात ते असते का? नसते. दोरीवर सर्पाचा आरोप होतो. पण प्रत्यक्षात तेथे सर्प असतो तो का? नाही.



या ठिकाणी बुवा उष्ट्रलकुटी न्यायाचा उल्लेख करतात. संस्कृत भाषेत उष्ट्र म्हणे उंट. लकुटी म्हणजे लाकूड. राजस्थानसारख्या वाळवंटी प्रदेशात प्रवासासाठी, शेतीसाठी आणि मालवाहतुकीसाठी उंटाचाच वापर होतो. उंटावर लाकडाचे ओझे लादलेले असते. खोडील उंट हळुहळू चालतो किंवा थबकत चालतो. म्हणून मालक उंटावर लादलेल्या लाकडांतून एखादे लाकूड उचलतो. त्याने उंटाच्या पार्श्वभागावर एक फटका मारतो. मग उंट वेगाने चालू लागतो. ओझ्यातून काढलेले लाकूड मालक परत ओझ्यात ठेवून देतो. संस्कृत भाषेत याला उष्ट्रलकुटी न्याय असे म्हणतात . संस्कृत भाषेत शेकडो न्याय आहेत. येथे बुवांनी आपला सिध्दान्त उष्ट्रलकुटी न्यायाने श्रोत्यांना पटवून दिलेला आहे. तो अगदी चपखल आणि कुणालाही पटण्यासारखाच आहे. कीर्तनकार आणि प्रवचनकार आपल्या वेदोपनिषदे आणि पुराणांचे भाष्यकार असतात. म्हणून आपण कीर्तनप्रवचने ऐकत जावीत, असे सांगत असतो. त्यात आपल्या संस्कृतीची सूक्ष्म बीजे लपलेली असतात. आधुनिक भाषेत त्यात व्यक्तीमत्वविकासाचीही बीजे पेरलेली असतात.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.

# राज्यसभेच्या एका जागेसाठी भाजपकडून उमेदवार जाहीर

## दुसरी जागा अजित पवारांसाठी सोडली

**मुंबई : प्रतिनिधी**

**महाराष्ट्राच्या रिक्त झालेल्या राज्यसभेच्या जागेसाठी भाजपने धैर्यशील पाटील यांना उमेदवारी जाहीर केली आहे. धैर्यशील पाटील हे भाजपचे जिल्हाध्यक्ष आहेत. दक्षिण रायगड जिल्ह्याची जबाबदारी त्यांच्याकडे आहे. आता त्यांच्यावर पक्षाने विश्वास दाखवत त्यांची वर्णी थेट राज्यसभेवर लावली आहे.**

भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय निवडणूक समितीने महाराष्ट्रातून भाजपचे धैर्यशील पाटील यांच्या नावाची घोषणा केली आहे. त्यामुळे आता रायगड जिल्ह्यातील धैर्यशील पाटील हे भाजपचे राज्यसभेचे उमेदवार असतील. धैर्यशील पाटील हे शेकापमधून भाजपमध्ये दाखल झाले आहेत. त्यांनी लोकसभा निवडणूक लढवण्याची तयारी देखील केली होती. मात्र, महायुतीमध्ये रायगडची जागा राष्ट्रवादीला सुटल्यामुळे त्यांनी पक्षादेश मानत माघार घेतली होती. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने कोकण आणि मुंबईवर लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय घेतला आहे. याच रणनीतीचा एक भाग म्हणून धैर्यशील पाटील यांना देण्यात आलेल्या उमेदवारीबाबत बोलले जात आहे.

**भाजपकडून एकाच नावाची घोषणा**

राज्यसभेच्या रिक्त झालेल्या दोन जागांवर भाजप उमेदवार देण्याची शक्यता वर्तवली जात होती. मात्र, महायुतीमध्ये सामील झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने भाजपकडे एक जागा मागितली आहे. त्यानुसार राज्यसभेची एक जागा आता अजित पवार यांना सोडण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. भारतीय जनता पक्षाच्या वतीने एकाच नावाची घोषणा करण्यात आली आहे. त्यामुळे अजित पवार कोणाला राज्यसभेची उमेदवारी देतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**नितीन पाटील यांच्या नावाची चर्चा**

लोकसभा निवडणुकीमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सातारा लोकसभा मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाच्या उमेदवाराला निवडून आणण्याचे आवाहन पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना केले होते. त्याचवेळी साताऱ्यात भाजपचा उमेदवार निवडून आणल्यास साताऱ्यातील नितीन पाटील यांना राज्यसभेत पाठवेल, असा शब्द अजित पवार यांना दिला होता. तेव्हापासूनच नितीन पाटील यांच्या नावाची चर्चा सुरू होती. त्यामुळे आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वाटेला आलेल्या एका जागेवर अजित पवार नितीन पाटील यांच्या नावावर शिक्कामार्फ करतील, अशी शक्यता वर्तवली जात आहे.



# संगणकशास्त्र विषयात कौशल्याधिष्ठित परिपक्व व्हा

## प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांचा कानमंत्र

पारनेर : प्रतिनिधी

**संगणकशास्त्र या विषयात भविष्यकाळात रोजगाराच्या अनेक संधी प्राप्त होणार असून त्यासाठी विद्यार्थ्यांनी या विषयात कौशल्याधिष्ठित व अधिकाधिक परिपक्व शिक्षण घेण्याचा कानमंत्र पारनेर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांनी दिला.**

पारनेर महाविद्यालयातील संगणकशास्त्र विभागातील प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. मतकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे, विभागाचे समन्वयक डॉ. रविंद्र देशमुख हे यावेळी उपस्थित होते.

डॉ. मतकर म्हणाले, कौशल्याधिष्ठित परिपक्व शिक्षण घेतल्यानंतर ज्ञानाच्या अनेक क्षेत्रात उंच भरारी सहजरीत्या घेता येईल. आजचा काळ झपाट्याने बदलतो आहे. तसेच माहिती, तंत्रज्ञान अतिशन वेगाने बदलत आहे. हे बदल स्विकारून स्वत:मध्ये अनेक चांगले कौशल्य अंगीकृत करता आली तर विविध आयटी कंपन्यांमध्ये नव्या संधी प्राप्त होतील असे मतकर यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी नीलेश सोबले, रामदास घोलप, विद्या फंड, सयाजी मोहिते, वैभव रोकडे, सोनाली आंबेकर, प्रियंका पठाडे, आम्रपाली नगरे, चैताली मते, जैनाब सय्यद, सागर जगदाळे, गौरी रणखांब, प्रतिक्षा ढवळे, दीप्ती चत्तर, विद्या ढुबे, दिपक कनिंग्ध्वज यांनी परिश्रम घतले. पूनम पारधी यांनी सुत्रसंचलन, विद्या फंड यांनी प्रास्ताविक, सयाजी मोहिते यांनी आभार मानले.




पारनेर महाविद्यालयात संगणकशास्त्र विभागाच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

### प्रात्यक्षिक ज्ञानावर भर

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार संगणकशास्त्र विभागाचा अभ्यासक्रम हा नवीन ज्ञानाबरोबरच रोजगाराच्या अनेक संधी विद्यार्थ्यांना सहजरित्या उपलब्ध व्हाव्यात या दृष्टीकोनातून तयार करण्यात आला आहे. या अभ्याक्रमात प्रात्यक्षिक ज्ञानावर अधिक भर देण्यात आला आहे. संगणकशास्त्र विभागात विद्यार्थ्यांसाठी कौशल्याधिष्ठित अनेक नवनवे अभ्यासक्रम आहेत. या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेउन विषयाचे अधिकचे ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करायला हवा.

डॉ. रविंद्र देशमुख

### नवनवीन उपक्रमांचे आयोजन

भारत हा जगातील सर्वात तरूण देश आहे. आपल्या देशात सर्वाधिक युवक आहेत. युवकांच्या हाताला योग्य काम मिळाले, योग्य शिक्षण मिळाले तर आपला देश बलशाली होईल.विद्यार्थ्यांना नवनवीन गोष्टी शिकण्यासाठी महाविद्यालयात नवनवीन उपक्रमांचे आयोजन सातत्यपूर्ण करण्यात येणार आहे. या उपक्रमांतून विद्यार्थ्यांना अनेक चांगल्या गोष्टी शिकायला मिळतील.

डॉ. लक्ष्मणराव मतकर, प्राचार्य

### सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन

स्वागत समारंभानिमित्त सांस्कृतीक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते. एकांकिका, नाटक, लावणीच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन या कार्यक्रमांमधून घडले. हिंदी विभागप्रमुख डॉ. विजयकुमार राउत, गणिताच्या प्रा. साफिया तांबोळी यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

# दुधाचे अनुदान शेतकऱ्यांना तातडीने मिळावे; शेतकरी नेते अनिल देठे पाटील

पारनेर : प्रतिनिधी

**राज्यातील दुध खरेदी दर मागील काही महिन्यांपासून पंचवीस रुपयांपर्यंत खाली आलेले होते त्यामुळे राज्यभरातील दुध उत्पादक शेतकऱ्यांनी व विविध शेतकरी संघटनांनी दुध दरवाढीसाठी आंदोलने केली होते त्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने शासन निर्णय घेतल्याची माहिती शेतकरी नेते अनिल देठे यांनी दिली.**

याबाबत बोलताना देठे म्हणाले की, शासन निर्णयात म्हटले होते की, राज्यातील खासगी तसेच सहकारी दुध संघांनी १ जुलै पासून ३.५ फॅट व ८.५ एसएनएफ गुणप्रत असलेल्या दुधाला प्रती लिटर ३० रू.दर द्यावा व राज्य सरकार देखील



प्रति लिटर पाच रुपये अनुदान देईल त्या अनुषंगाने राज्यातील बहूतांश दुध संघांनी शासन निर्णयानुसार दर देण्यास सुरुवात केली मात्र राज्य शासनाच्या वतीने पाच रुपये प्रति लिटर अनुदान शेतकऱ्यांना अद्याप मिळालेले नसल्याने बहुतांश शेतकऱ्यांनी शेतकरी नेते अनिल देठे पाटील यांना याबाबत निदर्शनास आणून दिले.

देठे पाटील यांनी नाशिकचे दुग्ध विकास आयुक्त श्री शिरपुरकर यांना भ्रमणध्वनीवरून संपर्क साधत यासंदर्भात विचारणा केली असता त्यांनी सांगितले की,ज्या दुध संघांच्या फाईल्स आमच्याकडे दाखल झालेल्या आहेत त्या संघांना दुध घालणाऱ्या दुध उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदान जमा करत आहोत. त्यामुळे संघांनी लवकरात लवकर आमच्याकडे फाईल्स पाठवाव्यात म्हणजे दुध उत्पादक शेतकऱ्यांच्या थेट खात्यावर तातडीने अनुदान जमा करता येईल.

त्यामुळे अहमदनगर जिल्ह्यातील खासगी व सहकारी दुध संघांनी अनुदानासाठी तातडीने फाईल्स दुग्ध विकास विभागाकडे दाखल कराव्यात असे आवाहन शेतकरी नेते अनिल देठे पाटील यांनी केले आहे.

# पळवे घाणेगांव रस्त्याची दुरावस्था; प्रशासनाचे दुर्लक्ष

पळवे खुर्द : प्रतिनिधी

**पळवे खुर्द ते घाणेगांव या रस्त्याची दुरावस्था झाली असून सततच्या पावसामुळे या रस्त्यावरून पायी चालणेही दुरापास्त झाल्याचे या रस्त्याची तातडीने दुरूस्ती करण्याची मागणी करण्यात येत आहे. प्रशासनाकडून मात्र ग्रामस्थांच्या मागणीकडे सोईस्करपणे दुर्लक्ष करण्यात येत आहे.**

पळवे ते घाणेगाव हा दोन किलोमिटरचा संपूर्ण रस्ता खराब झाला असून त्यामुळे नागरीकांची डोकेदुखी वाढली आहे. या रस्त्यालगत जिल्हा परिषदेची शाळा असून विद्यार्थ्यांना शाळेपर्यंत पोहचण्यासाठी दररोज कसरत करावी लागत आहे. या रस्त्यालगत व्यंकटेश प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी असून या कंपनीमध्ये येणार्या व जाणाऱ्या अवजड वाहनांमुळे रस्त्याची नेहमीच दुरावस्था होते. या



पळवे ते घाणेगाव या रस्त्याची पावसामुळे दुरावस्था झाली आहे.

कंपनीच्या सामाजिक सेसमधून या रस्त्याचे काम करणे आवष्यक आहे. पळवे तसेच घाणेगांव ग्रामस्थांनी यासंदर्भात वारंवार पाठपुरावा करूनही कंपनी प्रशासनाकडून त्याचा विचार करण्यात येत नाही.

या रस्त्याच्या बाजूने शेतकऱ्यांच्या शेत जमीनी आहेत. शेतामध्ये जाऊन जनावरांचा चारा आणण्यासाठी तसेच दुध वाहतूक करण्यासाठी दररोज शेतकऱ्यांना कसरत करावी लागते. या रस्ता पुढे गटेवाडीकडेही जात असल्याने तेथील प्रवाशांनाही मनस्थाप सहन करावा लागतो. ग्रामस्थांच्या या मागणीचा विचार करून प्रशासनाने या रस्त्याची तात्काळ दुरूस्ती हाती घेउन दिलासा देण्याची मागणी पळवे खुर्द येथील मठ वस्तीच्या ग्रामस्थांनी केली आहे.

# जातेगावच्या भैरवनाथ देवस्थानला बवर्गाचा दर्जा

## अध्यक्षा सुनिता पोटघन यांची माहिती

सुपा : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील जातेगाव येथील श्री भैरवनाथ देवस्थान ट्रस्टचा ब वर्ग तिर्थक्षेत्रात राज्य सरकारने समावेश केला आहे. यापुर्वी पारनेर तालुक्यातील ३ देवस्थान बवर्गात आहेत त्यामध्ये संत निळोबाराय देवस्थान पिपळनेर कोरठण खंडोबा देवस्थान पिपळगांव रोठा मळगंगा देवस्थान निघोज हे देवस्थान ब वर्ग असून चौथे ब वर्ग देवस्थान जातेगावला मिळाले आहे. त्यामुळे पारनेर तालुक्यातील वैभवात भर पडणार आहे ब वर्ग मिळाल्याने देवस्थान विकास कामात झपाट्याने वाढ होईल असे अध्यक्षा सुनिता पोटघन यांनी सांगितले.**

श्री भैरवनाथ देवस्थान हे नगर पुणे हायवेवरून १ किलोमिटर च्या अंतरावर व निसर्ग रम्य परिसरात डोंगर कपारीत वसलेले आहे. हे देवस्थान १९ ९१ ट्रस्टचे रजिस्टेशन झाले आहे. या मंदिरांची पुरातन विभागाकडे इ.स.१२२९ मध्ये त्या मंदिरासाठी दिपमाळ साठीच्या खर्चाच्या नोंद आढळली आहे.

हे देवस्थान नगर, नाशिक व पुणे या जिल्ह्यातून तसेच महाराष्ट्रासह ५ राज्यातून लाखो भाविक भक्त येत असतात व हे देवस्थान निसर्ग रम्य परिसरात व खोल दरीत बसले आहे, या देवस्थानची चैत्र पौर्णिमेला हनुमान जयंतीच्या दिवशी मोठा यात्रा उत्सव भरतो, जवळ जवळ चार - पाच लाख भाविक दर्शनासाठी येतात पानोली,पळवे खु,पळवे बु, वाडेगव्हाण,



नारायणगव्हाण या पाच प्रमुख गावची पालखी सोहळा असतो. अनेक गावचे मानकरी येतात. यात्रेच्या रात्री लाखो रुपयांची शोभेची दारू उडवली जाते तसेच दर रविवारी येणाऱ्या हजारो भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन केले जाते.

देवस्थान ब वर्गात आणण्यासाठी मा.सरपंच विठ्ठल भगवंत पोटघन, भैरवनाथ देवस्थानच्या अध्यक्षा सुनिता विठ्ठल पोटघन व सचिव सचिन चद्रकांत ढोरमले, उपाध्यक्ष सुरेश बोरूडे सर, कै.शिवराम पोटघन खजिनदार, सभापती गणेश शेळके, दत्तात्रय ढोरमले, विजय जगताप, विशाल फटांगडे, निर्मला कळमकर, शिवाजी भगत, जयसिंग धोत्रे, सोनाली ढोरमले, रुपाली पोटघन, गणेश वाखारे, सविता ढोरमले व सर्व विश्वस्त मंडळ यांनी प्रयत्न केले.

मंत्री दिलीपराव वळसे पाटील व नगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व खा. नीलेश लंके यांनी अभिनंदन केले आहे.

# निघोजला गुरुवारी रास्ता रोको आंदोलन

## बदलापूर अत्याचार घटनेचा निषेध । रूपेश ढवण यांची माहिती

निघोज : प्रतिनिधी

**बदलापूर येथील दुर्दैवी घटनेचा निषेध करण्यासाठी निघोज येथील एस टी बस स्थानक परिसरात गुरुवार दि.२२ रोजी सकाळी दहा वाजता ग्रामस्थांच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार येणार असल्याची माहिती आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रुपेश ढवण यांनी दिली आहे.**

या निवेदनाच्या प्रती खासदार नीलेश लंके, जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक, तहसीलदार, पोलिस निरीक्षक यांना देण्यात आल्या आहेत. ढवण याबाबत सांगितले की बदलापूर शाळेतील लहान विद्यार्थीनीवर अत्याचार करुण मोठा गुन्हा केला असून या दुर्दैवी घटनेची पाठराखण राज्य सरकारने आरोपीवर कारवाई करण्यासाठी उशीर करुन एक प्रकारे आरोपी व ज्या शिक्षण संस्थेतील शाळेत हा घृणास्पद प्रकार झाला त्या शिक्षण संस्था चालकाला व आरोपीला पाठीशी घालण्याचा जो निंदणीय प्रकार झाला तो निषेधार्थ आहे.

याविरोधात मुंबई परिसरात मोठ्या प्रमाणात आंदोलन झाली आहेत. याबाबत ग्रामीण भागात



आंदोलन करीत राज्य सरकार संबंधित पोलिस अधिकारी व संस्था चालक यांचा निषेध होण्याची गरज आहे. यासाठी निघोज येथे गुरुवार दि.२२ रोजी सकाळी दहा वाजता रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असून जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन निघोज ग्रामस्थांनी केले आहे.

बदलापूर येथील घटनेचा निषेध करण्यासाठी निघोज येथे गुरुवार दि.२२ रोजी रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनाचे निवेदन पारनेरचे पोलिस उपनिरीक्षक खंडागळे यांना दिले देण्यात आले. यावेळी आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रुपेश ढवण, बाबा महाराज खामकर, शिवसेनेचे युवा नेते महेंद्र पांढरकर सुरेश रासकर, अक्षय भाकरे , राजाराम पांढरकर आदी उपस्थित होते.

# स्त्री सन्मानाचा संदेश देत डी.बी.एम स्कूलने साजरी केली अनोखी राखी पौर्णिमा!

## दहा वर्षांची परंपरा राखत रक्षाबंधन उत्साहात




राळेगणसिद्धी : प्रतिनिधी

**नारळी पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर डी.बी.एम. स्कूलमध्ये गेल्या दहा वर्षाची परंपरा राखत रक्षाबंधन सणाचा उत्सव अत्यंत हर्षोल्हासात साजरा करण्यात आला.विद्यार्थ्यांनी या पवित्र सणाची महती समजून घेतली आणि त्यानुसार विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमात शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचारी वर्गाने सहभाग घेतला.**

आवाजात सौ मंडलिक मॅडम आणि ढोरमले मॅडम यांनी गीते सादर केली तर इयत्ता दहावीच्या व आठवीच्या विद्यार्थिनींनी ही बहीण भावाच्या नात्यांवर आधारित गीते गायली तसेच भाषणांमधून पौराणिक संदर्भ देत रक्षाबंधनाचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यालयाच्या शिक्षिका पोटघन मॅडम यांनी रक्षाबंधनाच्या पौराणिक आणि सांस्कृतिक महत्त्वावर विवेचन करत संत ज्ञानेश्वर व मुक्ताईच्या विश्वबंधुत्वाची आठवण करून दिली. विद्यार्थ्यांना या सणाच्या इतिहासाची ओळख करून देत, त्यात दडलेल्या भावनांचा उलगडा करण्यात आला. ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये या सणाबद्दल अधिक आत्मीयता निर्माण झाली.

यानंतर विद्यार्थिनीनी सर्व विद्यार्थ्यांना राख्या बांधल्या.
विद्यार्थ्यांनी आपल्या बहिणींच्या रक्षणाचे तसेच त्यांना सन्मानाची वागणूक देण्याचे वचन दिले. मिठाई आणि छोटे भेटवस्तू देऊन आपले प्रेम आणि कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थ्यांबरोबरच शाळेतील शिक्षक व पुरुष कर्मचारी यांनाही यावेळी राख्या बांधून खरा बंधुभाव जोपासला शाळेचे मुख्याध्यापक जे. डी. मापारी सर यांनाही पारंपारिक पद्धतीने पाठ रांगोळीच्या थाटात शाळेत राखी बांधण्यात आली.हा क्षण अत्यंत हृदयस्पर्शी आणि भावनिक होता.
रक्षाबंधनाच्या निमित्ताने शाळेत आठवड्यापूर्वीच राखी बनविण्याच्या प्रकल्पाचे आयोजन करण्यात आले होते यातही विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला व सैनिकांनाही सीमेवर राख्या पाठवल्या होत्या.

विद्यालयाचे मुख्याध्यापक जे. डी. मापारी सर यांनी विद्यार्थ्यांच्या या उत्साही सहभागाचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की, अशा कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये एकता,बंधुभाव,सहकार्य आणि आपुलकीची भावना वाढीस लागते. त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.
शाळेच्या संपूर्ण वातावरणात या उत्सवामुळे एक वेगळाच रंग भरला होता. विद्यार्थी आणि शिक्षक एकत्र येऊन सण साजरा करताना दिसले, ज्यामुळे शाळेचा संपूर्ण परिसर आनंदाने गजबजून गेला होता. रक्षाबंधनाचा हा उत्सव विद्यार्थ्यांसाठी अविस्मरणीय ठरला.

# मुस्लिम समाज कमिटीच्या अध्यक्षपदी साजीद तांबोळी

## उपाध्यक्षपदी जाफरभाई मोमीन यांची बिनविरोध निवड । अस्लमभाई इनामदार यांची माहिती

निघोज : प्रतिनिधी

**निघोज मुस्लिम समाज कमिटीच्या अध्यक्षपदी साजीदभाई तांबोळी उपाध्यक्षपदी जाफरभाई मोमीन यांची बिनविरोध निवड करण्यात आली असून या निवडीचे सर्वत्र स्वागत होत असल्याची माहिती अल्पसंख्याक समाजाचे नेते व मुस्लिम समाज कमिटीचे कार्यकारणी सदस्य अस्लमभाई इनामदार यांनी दिली आहे.**

नुकत्याच एका समाजाच्या सदस्यांच्या बैठकीत ही निवड करण्यात आली आहे. कार्यकारिणी सदस्य म्हणून अस्लमभाई इनामदार, सुलतान सय्यद, इम्तियाज मोमीन, वसीम मोमीन, सादिक फकीर आदींची निवड बिनविरोध व सर्वानुमते करण्यात आली आहे.



यावेळी अधिक माहिती देताना अस्लमभाई इनामदार यांनी सांगितले की निघोज गावची लोकसंख्या मोठी आहे. गेली अनेक वर्षांपासून हिंदू - मुस्लिम समाजाचे सण सर्व समाजबांधव एकत्र साजरे करीत जातीय सलोखा टिकवण्याचे काम करतात. मुस्लिम समाज कमिटीच्या वतीने सामाजिक, धार्मिक कामे मोठ्या प्रमाणात होऊन समन्वय साधण्याचे काम मोठ्या प्रमाणात होत आहे. नुकताच दि.१५ ऑगस्ट हा राष्ट्रीय सण स्वातंत्र्य दिन येथील मशिदीवर तिरंगा झेंडा फडकावीत ध्वजारोहण इस्मालभाई हवालदार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मौलाना अफजल हुसेन, शामिरभाई हवालदार, वजीरभाई तांबोळी, वसीम मोमीन, गनिभाई हवालदार, गुड्डू इनामदार, अलिमभाई हवालदार, इमरान पठाण, शोएब मोमीन, शरीफ मोमीन, सलमान सय्यद, रियाज हवालदार, समीर सय्यद, अल्फेज इनामदार, मळगंगा यात्रा उत्सव समीतीचे अध्यक्ष शिवाजीराव लंके, सहाय्यक कामगार तलाठी सुनिल उचाळे, पारनेर तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष भास्करराव कवाद तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व उर्दू शाळेचे विद्यार्थी तसेच मुख्याध्यापक व शिक्षक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ध्वजारोहण करण्याचे हे पहिलेच वर्ष होते अशाप्रकारे सामाजिक व धार्मिक काम करताना राष्ट्रीय सण साजरे करणे हे आपले कर्तव्य आहे या भावनेतून आपल्या देशाचा स्वातंत्र्य पुर्व इतिहास पाहिला तर स्वातंत्र्यासाठी सर्व समाजाच्या लोकांनी किती मोठे योगदान दिले असून देशाचे ऐक्य अबाधित ठेवण्यासाठी सर्व समाजबांधवांनी एकत्र येण्याची खऱ्या अर्थाने गरज असल्याचे प्रतिपादन मुस्लिम समाज कमिटी व नूतन पदाधिकारी व अल्पसंख्याक समाजाचे नेते अस्लमभाई इनामदार यांनी व्यक्त केले आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com